# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : शनिवार 31 मे 2008
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री दत्ताराम विष्णु साटम | 8. श्री सुनिल सदानंद राणे |
| 2. श्री मधुसुदन श्रीधर राणे | 9. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 3. श्री पांडूरंग सावजी राणे | 10. श्री उत्तम वामन राणे |
| 4. श्री जयवंत नाना राणे | 11. श्री अविनाश बाळकृष्ण राणे |
| 5. श्री अशोक दत्ताराम राणे | 12. श्री उदय भगवान राणे |
| 6. श्री राजेन्द्र वासुदेव राणे | 13. श्री मंगेश मनोहर राणे |
| 7. श्री आनंद नारायण साटम | 14. श्री शशिकांत वसंत राणे |

दिनांक 31 मे 2008 रोजी मौजे पिसेकामते-फळसेवाडी (टेंबवाडी) मधील ग्रामस्थांची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्या निवासस्थानी पार पडली. सभेस वरील ग्रामस्थ उपस्थित होते.

उपरोक्त मिटींगचे अध्यक्षस्थान जेष्ठ ग्रामस्थ श्री दत्ताराम विष्णु साटम देण्यात आले, यानंतर वाडीला भेडसावणारा पाण्याचा प्रश्न यावर चर्चा करण्यात आली. या संर्दभात श्री मधुसूदन श्रीधर राणे यांनी पाणी प्रश्न कसा भेडसावतो व कश्या तऱ्हेने सोडविता येईल याची पूर्व पिठीका थोडक्यात सांगितली. या चर्चेमध्ये श्री पांडूरंग सावजी राणे व श्री अशोक दत्ताराम राणे यांनी भाग घेतला.

नळपाणी योजना चालू आहे परंतू याचा सध्या कसा काय त्रास होतो, अपूरा पाणीपुरवठा, मशीन बंद असणे, याबद्दल माहीती घेण्यात आली. याच अनुशंगाने अजुनही पुढे जाऊन हा प्रश्न कसा सोडविता येईल या विषयावर श्री मधुसूदन श्रीधर राणे व श्री जयवंत नाना राणे यांनी प्रकाश टाकला.

हा प्रश्न सोडवायचा असेल तर झरी येथील जून्या विहीरीचे पुर्नउत्खनन करावे लागेल अशी माहीती देण्यात आली. यासाठी जे प्रयत्न झाले त्याची माहीती देण्यात आली.

श्री जोशी, पाणी दाखविणारे गृहस्थ श्री रत्नाकर नाना राणे घेऊन आले होते. त्यांनी झरीची जागा पाहणी करून सांगितले की येथे पाणी मिळेल. यासाठी प्रथम खालील गोष्टींचे पूर्तता करावी लागेल.

1. जागा धारकाचे 'जागा सार्वजनिक विहीरीकरीता दिली' असे प्रतिज्ञापत्र व सातबारा उतारे
2. अंदाजीत खर्च रु.1.55 लाख ते रु.1.80 लाख
3. सरकारकडून शेतविहीर घ्यावयाची (33 फूट खोल व 24 फूट रुंद) तर मिळणारी रक्कम व अंदाजित खर्च याबाबत चर्चा करण्यात आली.

4. या विहीरीसाठी लागणारा खर्च जवळजवळ रु.2.00 लाख आहे त्यासाठी माननिय नामदार श्री नारायणराव राणे साहेब यांना भेटणे व मदत मागणे.
5. विहीरीसाठी खर्च रु.2.00 लाख, देणगीदार

| | |
|---|---|
| श्री रत्नाकर नाना राणे | रु.25,000/- |
| आमदार फंड | रु.25,000/- |
| श्री मधुसूदन श्रीधर राणे व कुटूंबिय | रु.15,000/- |
| श्री मंगेश मनोहर राणे | रु.10,000/- |
| श्री शंकर बाळकृष्ण राणे | |
| श्री अशोक दत्ताराम राणे | |
| श्री दत्ताराम विष्णु साटम | |
| श्री राजेन्द्र वासुदेव राणे | |
| श्री आनंद नारायण साटम | |
| श्री पांडूरंग सावजी राणे | |

6. त्यासाठी समिती स्थापणे, पावती पुस्तक, डोनेशन, घरातील मंडळीनी विचार करणे, पिसेकामते-टेंबवाडी सार्वजनिक विहीर योजना, कायदेशीर बाबींवर चर्चा झाली
7. माननिय नामदार नारायणराव राणे यांना भेटण्यासाठी समिती श्री अशोक दत्ताराम राणे व श्री मंगेश मनोहर राणे
8. श्री विश्वनाथ दिनकर राणे, श्री मेघश्याम नारायण राणे, श्री रघुनाथ धोंडू राणे, श्री विश्वास ज्ञानदेव राणे (बंडू राणे), श्री उत्तम वामन राणे, श्री अविनाश बाळकृष्ण राणे, श्री विनोद विठोबा राणे, श्री रवि राणे, श्री यशवंत राणे

श्री रत्नाकर नाना राणे यांनी पाणी विहीरीसाठी श्री जोशी यांना बोलावून माहीती दिली त्यासाठी आभार. तसेच श्री जयवंत नाना राणे यांनी यासाठी रु.500/- खर्च केले त्यांचे आभार

वरील विहीर पाणी प्रश्न सोडविण्यासाठी हिरारीने प्रयत्न करावे यासाठी सहकार्य करावे असे सर्वांचे मत पडले.

शेवटी या सभेसाठी जागा व चहापाणी याची उत्तम व्यवस्था श्री मंगेश मनोहर राणे यांनी केली त्याबद्दल सर्वांचे वतीने श्री पांडूरंग सावजी राणे यांनी श्री मंगेश मनोहर राणे कुटूंबियांचे तसेच उपस्थितांचे व सभेच्या अध्यक्षांचे आभार मानले व सायंकाळी 7:30 वाजता सभा संपली असे जाहिर केले.

---